**<u>जाहीर सुचना.</u>**

**जिल्हाधिकारी, नाशिक यांचे कार्यालय,**
**(राज्य उत्पादन शुल्क, विभाग नाशिक)**
क्रमांक : टिओडी ११२०१७/५१९९
नाशिक, दिनांक २६ /०९/ २०१७

---

**नाशिक जिल्हयातील ताडी दुकानांचा फेर जाहिर लिलाव-नि-निविदा**
**सन २०१७-२०१८**

---

शासनाने ताडी दुकानाच्या नियंत्रण व नियमणासाठी महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव नि-निविदेव्दारे अनुज्ञप्ती देणे) व ताडी झाडे व (गाळणे) अधिनियम १९६८ जाहिर केला असून त्या अनुषंगाने शासन गृह विभाग अधिनियम क्र. टिओडी ११०१/सीआर-५/इएक्ससी-३, दिनांक ०४/०६/२००१ अन्वये महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव नि-निविदेव्दारे लायसन्स देणे) आदेश २००१ पारित केले आहेत. शासन निर्णय क्रमांक टिओडी -०७१७/प्र.क्र.२१९/राउशु-३, दि.२१ ऑगस्ट २०१७ व मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.टीओडी१८१४/ताडी२०१६-१७/ १६५२/अकरा ,दि.२२.०८.२०१७ नुसार सन २०१७-२०१८ या ताडी वर्षाकरिता दिनांक ३१/०८/२०१८ पर्यत ताडी दुकाने लिलाव-नि-निविदा या पध्दतीने मंजुर करण्याचे आदेश दिलेले आहेत. संबंधीत अधिनियम तसेच सदर आदेशाच्या तरतुदीनुसार ताडी वर्ष २०१७-२०१८ या मुदतीकरिता नाशिक जिल्हयातील एकुण **२३** ताडी दुकानांकरीता दि.१९.०९.२०१७ रोजी जाहिर लिलाव घेण्यात आला असता, एकुण २३ ताडी दुकानांपैकी २२ ताडी दुकानांकरीता अपेक्षित किंमत मिळाल्याने ती दुकाने लिलावाव्दारे देण्यात आलेली आहे. परंतु ऊर्वरीत **<u>इगतपुरी खालची पेठ</u>** या एका ताडी दुकानाकरीता अपेक्षित किंमत न मिळाल्याने सदर दुकानाचा फेर लिलाव घेण्यात येत आहे. सदर लिलावाकरीता दि.३०.०८.२०१७ रोजी जाहिर करण्यात आलेल्या जाहिर सुचनेमधील शर्ती व अटी कायम राहतील. नाशिक जिल्ह्यातील **<u>इगतपुरी खालची पेठ</u>** या ताडी दुकानाचा फेर लिलाव दि.**<u>१२/१०/२०१७ रोजी ठिक ११.०० वाजता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांचे कार्यालयातील बैठक सभागृहामध्ये करण्यात येणार आहे.</u>**

लिलावापुर्वी संबंधीत ताडी दुकाने देण्याची **<u>सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत नोटीस जाहिर झाल्यापासून दि. ११/१०/२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील.</u>** वरील मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. सिलबंद निविदा लिलावाच्या दिवशी संबंधीत ताडी दुकानाचा लिलाव झाल्यानंतर ताबडतोब उघडण्यात येतील. लिलावात आलेली बोलीची रक्कम किंवा निविदांमध्ये देकार असलेली रक्कम यामध्ये जी रक्कम जास्त असेल व ही रक्कम अपेक्षित किंमतीपेक्षा जास्त असेल तर त्या व्यक्तीच्या नावे ताडी दुकान मंजुर करण्यात येईल.

sd-
**अधीक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क, नाशिक**

sd-
**मा.जिल्हाधिकारी, नाशिक**